प्रेस नोट

## बिल्डर देवेन शहा मर्डर केस मधील दुसरा प्रमुख आरोपी राहुल शिवतारे सिंहगड पोलीसांकडुन जेरबंद

---

सदर बाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १३/१/२०१८ रोजी डेक्कन येथील प्रभात रोडवर बिल्डर देवेन शहा यांच्यावर ०२ इसमांनी गोळीबार करुन त्यांचे मुलासमोर त्यांचा खुन केला होता. सदर गुन्हयात निष्पन्न असलेल्या रवि चोरगे व राहुल शिवतारे या ०२ आरोपींपैकी रवि चोरगे यास डेक्कन पोलीसांनी अटक केली होती परंतु त्यातील दुसरा आरोपी राहुल शिवतारे हा अदयाप फरार होता.

संपुर्ण पुणे शहर पोलीस दल राहुल चा शोध घेत असतांना सिंहगड पोलीस स्टेशन कडील पोहवा/सुनिल पवार यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की राहुल शिवतारे हा राजाराम पुलाजवळील रिक्षा स्टॉप वर येणार आहे. सदरची बातमी मिळाल्यावर सिंहगड पो स्टे तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी राजाराम पुलाजवळ सापळा लावला. सदर ठिकाणी राहुल शिवतारे येताच नमुद अधिकारी/कर्मचारी यांनी राहुल यास ताब्यात घेतले. आरोपी नामे राहुल चंद्रकांत शिवतारे, वय ४५, रा जाधव नगर, वडगांव बु पुणे यास पुढील तपासकामी डेक्कन पोलीसांच्या ताब्यात दिले आहे.

---

## सिंहगड पोलीसांकडुन ०१ देशी पिस्टल व ०२ जिवंत काडतुसांसह रेकॉर्डवरील गुन्हेगार ताब्यात

दिनांक २४/१/२०१८ रोजी सिंहगड पोलीस तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी प्राप्त बातमीवरुन सिंहगड पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील आरोपी नामे शिवराज शंकर शिंदे, वय २९, प्लॅट न ३०७, झील कॉलेज समोर, न-हे यास गोल्ड जीम, पुणे बैंगलोर हायवे जवळ येथुन ताब्यात घेवुन देशी बनावटीचे ०१ पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे हस्तगत करुन सदर बाबत सिंहगड पो स्टे गुरन ४५/१८ आर्म ॲक्ट कलम ३(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील सदरच्या दोन्ही कामगिरी हया अपर पोलीस आयुक्त, दप्रावि श्री रविंद्र सेनगावकर, पोलीस उपआयुक्त परीमंडळ -२, श्री प्रविण मुंढे, सहा पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग डॉ शिवाजी पवार, वरीष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु जगताप, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गिरीष सोनवणे, पोलीस कर्मचारी सुनिल पवार, यशवंत ओंबासे, संतोष सावंत, दयानंद तेलंगे पाटील, दत्ता सोनवणे, राहुल शेडगे, मयुर शिंदे, सचिन माळवे, श्रीकांत दगडे, वामन जाधव, पुरुषोत्तम गुन्ला यांचे पथकाने केली.